## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

### तक्रार क्रमांक : १८१८/२०२१

**तक्रारकर्ता, श्री.हाजीमीयाँ खलील पटेल**
३०/१ चुडी मोहल्ला, धांगे हॉस्पिटल जवळ
ता.भिवंडी, जि.ठाणे

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त, प्रभाग समिती क्र.५, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, जुना एस.टी.स्टॅण्ड, कापआळी, ता.भिंवडी, जि.ठाणे ४२१ ३०२.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त, प्रभाग समिती क्र.५, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, जुना एस.टी.स्टॅण्ड, कापआळी, ता.भिंवडी, जि.ठाणे ४२१ ३०२.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ०२.०४.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| ०७.०७.२०२१ | --- | ३०.०८.२०२१ | ३०.०९.२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि. २४.११.२०२१ रोजीच्या अर्जान्वये *"माहिती मुदतीत दिलेली नाही."* असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ०२.०४.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी श्री.बाळाराम के.जाधव, सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती क्रमांक ५, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" मी आपले कार्यालयात दि.०२.०६.२०२१ रोजी लेखी तक्रार केली आहे. सदर तक्रारीची एक प्रत मी सोबत जोडली. प्र.स.क्र.५ चे लिपीक अनिल दिनकर निकम यांच्या विरोधात एक लेखी तक्रार केली होती सदर तक्रारीचे अवलोकन करुन व माझ्या तक्रारीवर कारवाईचे लेखी दस्तावेजाची नक्कल, जबाब, पंचनाम्याची नक्कल सहीशिक्क्यासह देण्यात यावी. कारवाई झाली नसेल तर का कारवाई झाली नाही याची माहिती देण्यात यावी. कारवाई करण्याचा अधिकार ज्या अधिकाऱ्यास आहे त्या अधिकाऱ्याचे नाव, पद, विभागाचे नाव देण्यात यावे, माझा अर्ज ज्या तारखेस दाखल झाला आहे त्या तारखेपासून आजपर्यंत तो अर्ज कुठल्या अधिकाऱ्यांकडे पडून होता त्या अधिकाऱ्याचे नाव, पद, विभागाचे नाव देण्यात यावे, त्यांनी माझ्या अर्जावर जो अभिप्राय, रिपोर्ट, शेरा नोंदविला आहे त्याची नक्कल सहीशिक्क्यासह देण्यात यावी, माझ्या तक्रार अर्जावर झालेल्या दैनंदिन प्रगती अहवालाची नक्कल सहीशिक्क्यासह देण्यात यावी."*

सदर प्रकरणी सुनावणीस उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, तक्रारकर्ता यांना अद्यापपर्यंत माहिती देण्यात आलेली नाही. कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारीयांनी विहित मुदतीत तक्रारकर्ता यांना माहिती दिली नाही. त्यानंतर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि.३०.०९.२०२१ रोजी आदेश पारित करुन, जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना १० दिवसात माहिती पुरविणेबाबत निर्देशित केले होते. त्यानंतर देखील तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली नाही.

यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या

शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. तसेच, आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली संपूर्ण माहिती पुरविणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त,प्रभाग समिती क्र.५, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी **तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.गिरीष घोष्टेकर, सहा.आयुक्त,प्रभाग समिती क्र.५, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक ०७.०७.२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतरही माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०७.०५.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०२ एप्रिल, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.गिरीष घोष्टेकर, सहा.आयुक्त,प्रभाग समिती क्र.५, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, जुना एस.टी.स्टॅण्ड, कापआळी, ता.भिंवडी, जि.ठाणे ४२१ ३०२.

**- यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.बाळाराम के.जाधव,
सहा.आयुक्त, प्रभाग समिती क्र.५, भिवंडी निजामपूर शहर
महानगरपालिका, जुना एस.टी.स्टॅण्ड, कापआळी,
ता.भिंवडी, जि.ठाणे ४२१ ३०२. **यांचेमार्फत रवाना.**